या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार १२ ऑगस्ट २०२४ | अंक२४६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# राज ठाकरेंना आरक्षणाची गरज नसेल,पण. मनोज जरांगे पाटील यांचं सडेतोड उत्तर

## तुमचे विचार लादू नका

राज साहेब ठाकरेंनी विचार करायला पाहिजे या गोष्टीचा काय गोरगरिबांना आरक्षणाची आवश्यकता आहे. जे त्यांना वैभव मिळाले गोरगरीब जनतेच्या मराठ्यांच्या जीवावर मिळालेले आणि श्रीमंताला आरक्षणाची किंमत नाही. राज ठाकरे यांनी या गोरगरीब जनतेची भावना फक्त एकदा जाणून घ्या आणि मग मला तुम्ही मराठ्यांना किंवा महाराष्ट्राला आरक्षणाची गरज नाही, हे ठरवा. विद्यार्थ्यांना विचारा विद्यार्थ्यांना विचारातून आरक्षण ची गरज आहे का ती जर नाही म्हणली तर मग तुमचं मत व्यक्त करा. प्रत्येक वेळेस तुमचेच विचार जनतेवर लादून चालत नाही. तुमचे विचार लादू नका, असे आवाहन त्यांनी राज ठाकरे यांना केले.

राज ठाकरे यांनी मराठवाडा दौऱ्यात आर्थिक आरक्षणाची भूमिका जाहीर केली. आर्थिक निकषावर सर्वांना आरक्षण देण्याची मागणी त्यांनी केली. त्यानंतर मराठा आंदोलक त्यांच्यावर नाराज झाले. आता राज ठाकरे आणि मनोज जरांगे पाटील यांच्यात शाब्दिक चकमक उडाली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी साताऱ्यात माध्यमांशी बोलताना राज ठाकरे यांच्या भूमिकेचा खरपूस समाचार घेतला. त्यांच्यावर टीका केली. त्यांनी मराठा आरक्षणाची भूमिका स्पष्ट केली. राज्यात कुठे पण मराठा समाजाचे आंदोलन सुरू नाही. कुणाला ही अडवू नका. कुणाला जाब विचारू नका. विनाकारण गालबोट लावायचा प्रयत्न करु नका.



देवेंद्र फडणवीस आणि त्यांचे सहकाऱ्यांनी असे आंदोलन करण्यासाठी षडयंत्र चालवल्याचा आरोप त्यांनी केला. आंदोलन करायचा की नाही हा शेवटी त्यांचा विचार आहे. समाजाने इतके दिवस सहन केले.

## फडणवीसांनी तयार केल्या टोळ्या

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आंदोलनात फूट पाडण्यासाठी वेगवेगळ्या टोळ्या तयार केल्याचा आरोप त्यांनी केला. मराठा आंदोलनाविरोधात सर्वात अगोदर येवल्याचा मुकादमाला कामाला लावले, त्यानंतर प्रवीण दरेकर यांच्यामार्फत काही जणांमध्ये फूट पाडली. आता त्यांना नारायण राणे यांच्या आडून आंदोलन सुरु केल्याचा आरोप त्यांनी केला. गरीब मराठ्यांविरोधात हे प्रकार का करत आहेत, असा सवाल त्यांनी केला. मराठा आरक्षणामुळे सत्ताधाऱ्यांना विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात फटका बसल्याशिवाय राहणार नाही, असे त्यांनी पुन्हा सांगितले. तर मुंबईतील परिस्थितीविषयी आताच भाष्य करणार नसल्याचे ते म्हणाले.



# बीड मनसे राज्यात गरुडझेप घेईल-राज ठाकरे

**बीड प्रतिनिधी**


।

बीड जिल्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेना ही राज्यात गरुडझेप घेईल व राज्याच्या राजकारणात वेगळीच छाप पाडेल असे कौतुक करुन राज ठाकरे यांनी दि.9 ऑगस्ट 2024 रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेना शहर मध्यवर्ती कार्यालयाचे शहरातील नगर नाका, कॅनॉल रोडवरील कार्यालयात केले तसेच अत्यल्प दरात रुग्णवाहिका सेवेच उद्घाटन त्यांनी केले. मनसेचे करण लोंढे, सोमेश कदम, ऋषिकेश गिराम यांच्या संकल्पनेतून उभारलेले कार्यायाचे उद्घाटन राज ठाकरे यांनी केले समवेत मनसेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राज ठाकरे म्हणाले की, ज्या प्रकारे तरुणाई वर्ग मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत पक्ष प्रवेश करत आहे हे पाहता येणाऱ्या काळात बीड जिल्ह्यात मनसे भरारी घेईल तसेच प्रश्न जिथे जनतेचा, मार्ग तिथे मनसेचा हे ब्रीद सोबत घेवून महाराष्ट्र नवनिर्माण घडवावे असे ते म्हणाले यावेळी. मनसेचे जिल्हा, तालुका पदाधिकारी, महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये उद्यापासुन बाळनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्यास सुरुवात..

**बीड / प्रतिनिधी**

- प्रति वर्षाप्रमाणे विसाव्या शतकातील महान संत विभूती वै. ह भ प ज्ञानेश्वर माऊली महाराज श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांच्या कृपाशीर्वादाने चालत आलेला अखंड हरिनाम सप्ताह व गुरुवर्य तपोनिधी बाळनाथ महाराज पालखी सोहळा सोमवार दि. 12 ऑगस्ट 2024 ते सोमवार दिनांक 19 ऑगस्ट 2024 पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दिनांक 19 ऑगस्ट 2024 सकाळी 9 वाजता श्री बाळनाथ महाराज यांचे पालखी मिरवणूक होणार आहे.



कलश पूजन व दीप प्रज्वलन व सप्ताह प्रारंभ श्री ह भ प तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य महादेव महाराज तात्या बाळनाथ माऊली संस्थान श्रीक्षेत्र चाकरवाडी यांच्या हस्ते होईल. तसेच दररोज सकाळी पहाटे 4 ते 6 काकडा भजन सकाळी 7 ते 10 ज्ञानेश्वरी पारायण 10 ते बारा12 गाथा भजन 4 ते 5 ज्ञानेश्वरी प्रवचन 5 ते 6 हरिपाठ रात्री 8 ते 10 हरिकीर्तन आणि 10 ते 3 संगीत भजन व जागर अशा प्रकारचे कार्यक्रम दैनंदिन रूपरेषेमध्ये पार पडणार आहेत. चालत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये आठ दिवस महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार यांचे कीर्तन रात्री 9 ते 11 या वेळेमध्ये होणार आहेत. तरी सर्वांनी होणाऱ्या कीर्तन श्रावणाचा लाभ घ्यावा.

दि. 19 ऑगस्ट 2024 रोजी सकाळी 9 वाजता पालखी मिरवणुकी सुरुवात होईल. श्री बाळनाथ महाराजांच्या पालखी विसर्जनानंतर महाप्रसाद होईल. तरी या सर्व होणाऱ्या कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन सर्व ग्रामस्थ मंडळी श्री क्षेत्र चाकरवाडी आणि तपोनिधी गुरुवर्य महादेव महाराज तात्या यांनी केले आहे. तसेच सायंकाळी ५ ते ८ या वेळेमध्ये गुरुवर्य तपोनिधी महादेव महाराज तात्या यांचे काल्याचे किर्तन होईल. सप्ताह मधील सर्व कार्यक्रम श्री ह भ प महादेव महाराज तात्या बाळनाथ माऊली संस्थान श्री शेत्र चाकरवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहेत. वरील सर्व कार्यक्रमाचा लाभ घेण्याच्या आवाहन समस्त गावकरी मंडळी श्रीक्षेत्र चाकरवाडी आणि श्री ह भ प महादेव महाराज तात्या यांनी केले आहे.

## यशवंती आधार सामाजिक संस्थेच्या वतीने अनाथ मुलांना स्कूल बॅग,शालेय साहित्य वाटप

**बीड प्रतिनिधी**

जनसेवा हीच ईश्वर सेवा या ब्रीद वाक्याला घेऊन चालणारी यशवंती आधार सामाजिक संस्था आहे या संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत हजारो विद्यार्थ्यांना मोफत करियर व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन,वृक्ष लागवड,आरोग्य शिबिर,विविध उपक्रम प्रामुख्याने राबवले जातात काही दिवसांपूर्वी सांगवी येथील सामाजिक कार्यकर्त्या आदिती निकम यांनी संस्थेला विनंती केली की आमच्या भागातील गरीब अनाथ मुलांना शाळेत जाण्यासाठी स्कूल बॅग नाहीत




आपण त्या उपलब्ध करून द्याव्यात संस्थेने लगेच आपल्या "विद्यार्थी दत्तक पालकत्व" उपक्रमाच्या माध्यमातून अनाथ मुलांना शालेय साहित्य व स्कूल बॅग वाटप करण्यात आले यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रेरणादायी वक्ते लेखक श्री.राजेश बाबासाहेब दिवटे व सामाजिक कार्यकर्त्या अदिती निकम उपस्थित होत्या.

# मुगगाव येथील भोलेश्वर यात्रेनिमित्त भाविक भक्तांनी आनंद घ्यावा - अशोक भवर

## जगामध्ये चौथ्या स्थानावर पश्चिम दिशेने स्वयंभू मंदिर

**मुगगाव प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील मुगगाव येथे श्रावण महिन्यात दुसऱ्या सोमवारी भोलेश्वर भवरदरा मंदिरामध्ये मोठी यात्रा भरनार आहे तरी तालुक्यातील व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या यात्रेचा आनंद घ्यावा असे अहवान अशोक भवर यांनी केले आहे.व असल्याने राज्यभर ठीक ठिकाणी श्रावणी सोमवार निमित्त महादेव मंदिर जिथे असेल तिथे छोट्या-मोठ्या यात्रा उत्सव भरल्या जातात त्याच धर्तीवर बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील जागरूक देवस्थान मुगगाव गावापासून पासून एक किलोमीटर अंतरावर असलेले भवरदरा येथे महादेवाचे मंदिर आहे. मात्र यावर्षी पारंपरिक असलेल्या भवरदा यात्रा होणार आहे तरी भावीक भक्तांनी सोमवारी यात्रा भरणार आहे. भवरदरा असे एक मंदिर आहे जे मंदिर शांत डोंगरांमध्ये वसलेले आहे त्या मंदिरामध्ये बसलेले देवो के देव महादेव हे सगळ्याला पावणारे व मनोकामना पूर्ण करणारे भगवंत परमेश्वर शिवशंकर यांची यात्रा आहे. भवरदरा देवस्थान निसर्गाच्या सानिध्यात डोंगराच्या कुशीत वसलेले आहे सौव बाजूने असलेला डोंगर पसरलेले हिरवळ मनमोहक दृश्य या ठिकाणी आहे या ठिकाणी दरवर्षी हजारो भाविक दर्शनासाठी येतात आणि हे एक जागरूक देवस्थान असून भाविकांची येथे खूप मोठ्या प्रमाणात श्रद्धा आहे. तरी यात्रेचा तालुक्यातील व परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अहवांना अशोक भवर यांनी केले आहे.



# २०२३ च्या कापूस-सोयाबीन अर्थसहाय्यासाठी कृषी सहाय्यकाकडे भरा संमतीपत्र - धनंजय मुंडे

## प्रतिहेक्टरी ५ हजारांचे अनुदान; ई-पीक पेरा नोंदणी असणारे सर्व शेतकरी लाभार्थी आधार संलग्न माहितीसाठी वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक नाहरकत देणे आवश्यक

**मुंबई (प्रतिनिधी)** (दि. 10) - सन 2023 मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी पाच हजार रुपये अर्थसहाय्य राज्य शासनाच्या वतीने देण्याचा निर्णय शासन स्तरावर झाला असून ही रक्कम शेतकऱ्यांना वितरित करण्यापूर्वी त्यांच्या आधार व बँक खात्याशी संलग्न असलेल्या माहितीचा वापर करण्यासाठी पात्र असलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांनी त्यांचे वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक नाहरकत पत्र आपल्या गावाशी संबंधित कृषी सहाय्यकाकडे जमा करणे आवश्यक असल्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी सांगितले आहे. 2023 च्या खरीप हंगामामध्ये कापूस व सोयाबीन चे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले. मात्र यावर उपाययोजना म्हणून कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून राज्य शासनाने मागील वर्षीच्या सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे दोन हेक्टर पर्यंत मदत देण्याची घोषणा केली व त्यानुसार निधी सुद्धा उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर रक्कम सोयाबीन- कापूस उत्पादक असलेल्या व ज्यांनी ई-पीक पेऱ्याची नोंदणी केलेली आहे अशा सर्व शेतकऱ्यांना केली जाणार असून, शेतकऱ्यांचे आधार व बँक खाते संलग्न असलेली माहिती, कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या खात्यांवर रक्कम वर्ग करण्याच्या कामासाठी माहिती हाताळण्यासाठी शेतकऱ्यांनी वैयक्तिक संमतीपत्र किंवा सामूहिक शेती असल्यास सामूहिक नाहरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक असल्याचे मुंडे यांनी स्पष्ट केले आहे. त्यानुसार पात्र असलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांनी सदर संमतीपत्र किंवा नाहरकत प्रमाणपत्र आपल्या गावाशी संबंधित असलेल्या कृषी सहाय्यकांकडे तातडीने सादर करावे, जेणेकरून अनुदानाच्या रकमा शेतकऱ्यांना शक्य तितक्या लवकर त्यांच्या संलग्न बँक खात्यांवरती वितरित करता येतील, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

# नाशिक येथे वंजारी समाज भुषण पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

## पुरस्कार सोहळ्यास सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : बाळासाहेब घुगे

**नाशिक।सुरेश इंगळ** १७/८/२०२४ रोजी सकाळी ठिक 11 वा वंजारी समाज भुषण पुरस्कार सोहळा आयोजित केला आहे तरी पुरस्कार सोहळ्यास सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन, पुरस्कार सोहळ्याचे आयोजक बाळासाहेब घुगे ( प्रभारी उत्तर महाराष्ट्र भाजपा दिव्यांग विकास आघाडी ) संकेत सानप, रंगनाथ दरगुडे, मारुती इलग, यांनी केले आहे. या पुरस्कार सोहळ्यासाठी अध्यक्ष म्हणून सोपान महाराज सानप शास्त्री, उद्घाटक कोंडाजी मामा आव्हाड, तर प्रमुख पाहुणे म्हणून महादेव जानकर (अध्यक्ष राष्ट्रीय समाज पक्ष) वाल्मीक अण्णा




कराड , बाळासाहेब सानप (संस्थापक अध्यक्ष भगवान महासंघ), तुळशीराम महाराज गुट्टे, उद्योगपती बुधाजी दादा पानसरे, आकाश खेडकर (अभिनेता), यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. यावेळी भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते गिरीश भाऊ पालवे, पंढरीनाथ थोरे, हरिभाऊ गीते (जलसंपदा अधिकारी), न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा यमुनाताई घुगे उपस्थित राहणार आहेत. यावेळी पुढील मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यामध्ये ह.भ.प.राधाताई सानप बीडकर, राजेंद्र बुधाजी पानसरे (युवा उद्योजक नाशिक), बी आर चकोर (बांधकाम व्यावसायिक), डॉ संतोष सुदामराव सानप (वैद्यकीय), शंकरराव शेळके (समाज सेवक), श्याम उगले (संपादक: दैनिक लोकनामा), दत्ता जायभाये ( संपादक : वंजारी पुकार किनवट ), नितीन ढाकणे ( उत्कृष्ट युवा पत्रकार : संपादक दैनिक अतुल्य महाराष्ट्र), शामराव गीते ( उद्योजक साई सत्यम उद्योग समूह ), अलका सानप (लेखिका व कवयित्री मुंबई), आदींसह मान्यवरांचा यावेळी सन्मान होणार आहे. कार्यक्रमाचे ठिकाण क्रांतिवीर वसंतराव नाईक शिक्षण संस्था कॅनडा कॉर्नर शरणपूर रोड नाशिक

## जि.प शाळेच्या प्रांगणात अवैध रित्या दारू विक्री



पैठण ।चैताली औटी जि.प.शाळा म्हारोळा प्रांगणात गेली अनेक वर्षांपासून अवैध रित्या दारू विक्री केली जात आहे.अनेकांनी प्रयत्न केला येथील दारू विक्री बंद करण्याच्या परंतु दादागिरी व गुंडगिरीच्या जोरावर कोणालाही जुमानत नाही.समोर दिसत असलेल्या दोन मजली घरामध्ये पाठीमागच्या बाजूस असलेल्या दरवाजा मधून बाटल्या दिल्या जातात शाळेच्या कंपाउंड ला लागून दिसत असलेल्या टपरीमध्ये दारूच्या मोकळ्या बाटल्या व काही भरलेल्या बाटल्या ठेवल्या जातात अनेक वेळा ही टपरी हटवण्याचा सुद्धा प्रयत्न झाला,परंतु अद्यापही या अवैध देशी दारू विक्रेत्यांनी ही टपरी हाटवलेली नाही.

सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करून दादागिरीच्या जोरावर त्या ठिकाणी घर बांधून दारू विक्री करत आहे.अशा प्रकारे हे चालू राहीले तर शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलांवर वेगळाच परीणाम होताना दिसेल. अनेक वेळा सोशल मीडियावर ही बातमी प्रकाशित होऊन ही काही परिणाम झालेला नसून कायदा व सुव्यवस्थेचा धाक अशा प्रकारे धंदे करणाऱ्यांना राहिलेला नाही.

## पूर्वीच्या चुका बाजूला ठेवून महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आतापासूनच विधानसभा निवडणुकीसाठी सज्ज व्हावे , रंगनाथ काळे

**।प्रतिनिधी** सोयगाव : महाविकास आघाडीच्या शनिवारी सोयगावला झालेल्या संवाद यात्रा बैठकीत सिल्लोड सोयगाव मतदार संघाची जागा कोणत्याही परिस्थितीत ताब्यात घ्यावी असा निर्णय घेत सोयगावत महाविकास आघाडीच्या संवाद यात्रेला शनिवारी ( दि 10 ) सुरुवात करण्यात आली यावेळी हंगामी विधानसभा निवडणुकीत महा विकास आघाडीच्या कोणत्याही उमेदवाराला उमेदवारी मिळाली तर एकजुटीने काम करण्याचे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्ष निरीक्षक शरद जी पवार गट ) मूलचंद पवार यांनी कार्यकर्त्यांना केले , यावेळी बैठकीत तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या ,( शरद पवार ) कार्यकर्त्यांनी रंगनाथ काळे यांना सिल्लोड सोयगाव मतदार संघातून उमेदवारी जाहीर करण्याचे गळ घातली होती , लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला सिल्लोड सोयगावत मिळालेल्या यशानंतर महाविकास आघाडीची मूठ घट्ट झाली आहे त्यामुळे शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेस , शरद पवार गट पक्ष निरीक्षक मूलचंद पवार यांच्या नेतृत्वाखाली संवाद यात्रा बैठक घेण्यात आली बैठकीला काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शांतीलाल अग्रवाल गेष्ठ नेते रंगनाथ काळे सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र पवार , उदव ठाकरे , शिवसेनेचे तालुकाध्यक्ष , दिलीप मचे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजू काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष डॉ, इंद्रजीत सोळुंके राष्ट्रवादीचे , शहराध्यक्ष रवी काळे , काँग्रेसचे शहराध्यक्ष दिनेश हजारी , ज्येष्ठ नेते राजेंद्र अहिरे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती ,

## खासगी ट्रॅव्हल्सवाल्यांचा प्रवाशी वाहतुकीच्या आड ड्रग्ज तस्करीचा धंदा!; सना ट्रॅव्हल्सचे कर्मचारी पकडले, नामांकित ट्रॅव्हल्स कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांच्याही सहभागाची शक्यता

**छ.संभाजीनगर।प्रतिनिधी** छत्रपती संभाजीनगर शहरातील खासगी ट्रॅव्हल्सवाल्यांनी प्रवाशी वाहतुकीआड ड्रग्ज तस्करीचा धंदा सुरू केल्याचे शनिवारच्या कारवाईतून समोर आले आहे. सना ट्रॅव्हलची राजवीर (एनएल ०१ बी १९०६) नावाच्या बसवर कारवाईनंतर आता शहरातील सर्वच खासगी ट्रॅव्हल्सची नियमित तपासणी गरजेची होऊन बसली आहे. नामांकीत ट्रॅव्हल्स कंपन्यांचे कर्मचारी तस्करीत गुंतले असल्याची कबुली पकडलेल्या ड्रग्जतस्करांनी दिल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. पेडलर सिकंदर खाजा शेख (वय ३२. रा. पटेलनगर, छत्रपती संभाजीनगर). ट्रॅव्हल बसचालक शब्बीर शेख शफी शेख (४२. रा. जालना) व क्लीनर अफरोज खान निजाम खान (२६. रा. कटकट गेट, छत्रपती संभाजीनगर) अशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत. शनिवारी (१० ऑगस्ट) पहाटे चारअशी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत. शनिवारी (१० ऑगस्ट) पहाटे चारला एनडीपीएस पथकाने मुंबई-छत्रपती संभाजीनगर




मार्गावर धावणारी सना ट्रॅव्हल्सची राजवीर ही बस पकडून ड्रग्ज रॅकेट उघडकीस आणले. पोलीस निरीक्षक गीता बागवडे यांना शहरात नशेच्या गोळ्यांसह पावडरसदृश एमडी ड्रग्स मुंबईच्या ट्रॅव्हल्समधून येत असल्याची माहिती मिळाली होती. पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या सूचनेवरून त्यांनी पथकासह पंचवटी कॉर्नर परिसरात सापळा रचला. पहाटे चारला बस येताच ड्रग्ज पेडलर सिकंदर चालकाच्या खिडकीजवळ पोहोचताच पोलिसांनी कारवाई केली. पोलीस उपनिरीक्षक संदीप शिंदे, अंमलदार लाल खान पठाण, सतीश जाधव यांनी सिकंदरच्या मुसक्या आवळल्या, तर पोलीस अंमलदार संदीपान धर्मे. महेश उगले. विजय त्रिभुवन, ऋषिकेश शेळके. छाया लांडगे यांनी चालक व क्लीनरला ताब्यात घेतले. चालक शब्बीरने सिकंदरच्या हाती दिलेल्या दोन मिठाईच्या बॉक्समध्ये ५. ७ ग्रॅम एमडी ड्रग्ज व १०३ नशेच्या गोळ्या आढळल्या. बेगमपुऱ्यातील अझहरने सिकंदरला हे काम सांगितले होते. मुंबईहून नगमा शेख बाजी ही महिला छत्रपती संभाजीनगरात ड्रग्ज पाठवते. सिकंदर, शब्बीरने दिलेल्या माहितीनुसार. शहरातील अनेक नामांकीत ट्रॅव्हल्स कंपनीचे कर्मचारी. चालक. क्लिनर या रॅकेटमध्ये सहभागी आहेत. त्यामुळे आता सर्वच ट्रॅव्हल्स नियमित झडती घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे. कुठे होतो ड्रग्ज पुरवठा? छत्रपती संभाजीनगर शहरातील महाविद्यालये. मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांसह तरुण- तरुणींना ड्रग्जचा पुरवठा केला जातो. मुंबईहून प्रवासी बॅग, मिठाईच्या बॉक्समधून ड्रग्ज आणले जाते. शहरातील तरुणाईला ड्रग्जचा कसा विळखा पडला आहे. याचे भयंकर चित्र या कारवाईतून समोर आले.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत आज मुंबई येथे निष्ठावंत शिवसैनिकांचा जाहीर प्रवेश!

## प्रवेश सोहळ्यासाठी चारशे गाड्यांचा ताफा मुंबईकडे होणार रवाना- जगताप, मुळूक

### मुख्यमंत्री शिंदे साहेबांची कार्यपद्धती आम्हा तरुणांना आकर्षित करणारी- कदम, बडे

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व शिवसेना मुख्य नेते यांच्या वतीने सामान्य माणसांसाठी राज्यात राबविण्यात येत असलेल्या नावीन्यपूर्ण योजना, शिंदे साहेबांची निर्णयक्षमता तसेच त्यांची कार्यपद्धती आणि पक्ष बांधणीची कसब आम्हा तरुणांना आकर्षित करणारी ठरली आहे. याबरोबरच त्यांच्या माध्यमातून आम्हा तरुणांच्या समस्या सुटतील या अपेक्षेने आम्ही बीड जिल्ह्यातील हजारो तरुण आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश करत आहोत असे मत गजानन कदम आणि ॲड रविराज बडे यांनी व्यक्त केले.

### बीडमधून आज हजारो महिला भगिनी मुंबई येथे शिवसेनेत प्रवेश करणार - अॅड. संगीता चव्हाण

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेब यांनी आपल्या कार्यकाळात महिलाच्या हितासाठी त्यांच्या सशक्तीकरणासाठी अनेक नावीन्यपूर्ण योजना राबवल्या आहेत तसेच मोठमोठी निर्णय घेतली आहे. शिंदे साहेब यांच्यात सामान्य गोरगरीब महिलांसाठी कायम आदरभाव दिसून येतो आहे. त्यांची पक्ष चालवण्याची कार्यपद्धती पूर्णतः हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या सारखीच आहे. बाळासाहेबांच्या विचारांचे खरे वारसदार आहेत यामुळे बीड जिल्ह्यातून आम्ही हजारो महिला आज मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश करत आहोत असे मत अॅड. संगीता चव्हाण यांनी व्यक्त केले.
ooooo



**बीड।प्रतिनिधी** हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर उबाठा शिवसेनेतील महिला आघाडी जिल्हाप्रमुख ॲड संगीता चव्हाण व सर्व महिला पदाधिकारी, युवासेना जिल्हाप्रमुख ॲड रवीराज बडे, गजानन कदम आणि त्यांच्या सर्व समर्थक कार्यकर्त्यांचा आज दि. 12 ऑगस्ट रोजी रात्री 8.00 वाजता नंदनवन निवास्थान मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री, शिवसेना मुख्य नेते यांच्या प्रमुख उपस्थित शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन भैय्या मुळूक यांच्या नेतृत्वाखाली जाहीर प्रवेश होणार आहे. या प्रवेश सोहळ्याकरिता बीड जिल्ह्यामधून चारशे गाड्यांचा ताफा मुंबई येथे दि.12 रोजी सकाळी 7.00 वाजता रवाना होणार असून तब्बल 2000 महिला आणि युवकांचा शिवसेनेत जाहीर होणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख मा.







# बिल्वपत्र हे शिवाच्या त्रिनेत्राचेही रूप-शि.भ.प. ज्योतीताई स्वामी

## श्रावण मास तपोनुष्ठान कार्यक्रमात शिवनामाचा जयघोष; महिला भाविकांची लक्षणीय उपस्थिती


**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**
माझ्या डाव्या डोळ्यात चंद्र, उजव्या डोळ्यात सूर्य आणि मध्यभागी अग्नी असल्याचे शिवजींनी सांगितले आहे. बिल्वपत्र हे शिवाच्या त्रिनेत्राचेही रूप आहे. बिल्वपत्र अर्पण केल्याने भगवान शंकरासह सूर्य, चंद्र आणि अग्नीची पूजा होते. स्कंद पुराणानुसार, बेलाच्या झाडात गिरजा, महेश्वरी, दक्षिणायनी, पार्वती, गौरी आणि कात्यायनी या देवी राहतात, म्हणून बिल्वपत्र अर्पण केल्याने या देवींचीही पूजा होते. असे प्रतिपादन कीर्तनकार शि.भ.प. ज्योतीताई स्वामी यांनी व्यक्त केले. टाळ आणि मृदूंगाचा निनाद , शिवनामाचा जयघोष अशा मंगलमय वातावरणात दिनांक 5 ऑगस्टपासून परळी वैजनाथ येथील पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेले श्री शनि मंदिर येथे वसुंधरारत्न डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर यांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने वीरशैव लिंगायत समाज व श्रावणमास तपोनुष्ठान समिती परळीच्या वतीने ष.ब्र.108 श्री गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या श्रावणमास तपोनुष्ठान मोठ्या उत्साहात सुरू असून दररोज सकाळी शिवपाठ, परमरहस्य ग्रंथाचे पारायण, गाथ्यावरील भजन , शिव कीर्तन , शिजागर व नामांकित कीर्तनकारांच्या कीर्तनाचे तसेच प्रसादाचे आयोजन दररोज करण्यात येत आहे. शुक्रवार दिनांक 9 ऑगस्ट रोजी कीर्तनकार शि.भ.प. ज्योतीताई स्वामी यांनी कीर्तन सेवा केली. 13 दिवस चालणा-या तपोनुष्ठान सोहळ्यात श्रावणमास तपोनुष्ठान



कालावधीत दररोज अन्नप्रसाद, अखंड शिवनाम सप्ताह,परमरहस्य पारायण सोहळा, कीर्तन, प्रवचन, वृक्षदान सोहळा, वृक्षारोपण, जलपुनर्भरण, आरोग्य तपासणी शिबीर, सांस्कृतिक व विविध समाज उपयोगी उपक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे.यासोबतच श्रावणमास तपोनुष्ठान सोहळ्या दरम्यान दररोज प्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवर्यांचे दामपत्य पुजन श्री. जगदीशअण्णा चौधरी व सौ.महादेवी चौधरी यांच्यावतीने करण्यात आली तसेच वैद्यनाथ देवस्थान कमिटीचे सचिव प्रा.बाबासाहेब देशमुख सर,विश्वस्त श्री. विजयकुमार मेनकुदळे,श्री.अनिल तांदळे,श्री. श्रीकांत जोशी,व मुंबई येथील बीपीसीएल कंपनीचे जनरल मॅनेजर सुरेश झंवर यांच्या हस्ते गुरूवर्यांची आरती करण्यात आली.या कार्यक्रमास भाविक भक्तांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे तरी जनकल्याणासाठी आयोजित करण्यात आलेल्या या तपोनुष्ठान, परमरहस्य पारायण सोहळ्याचा शहर व परिसरातील सर्व शिव भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन द्वादश पंचम् ज्योतीर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या परळी-वैजनाथ नगरीतील ष.ब्र.108 श्री गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या द्वादश श्रावणमास तपोनुष्ठान समितीचे अध्यक्ष चेतन सौंदळे,कार्यअध्यक्ष चंद्रकांत उदगीरकर,शाहूराव ढोबळे,उपाध्यक्ष रमेशअप्पा सपाटे,मकरंद नरवणे,प्रा. महेश्वर निर्मळे,रघुनाथअप्पा भाग्यवंत,चंदूअप्पा हालगे,संतोष पंचाक्षरी,मनोज संकाये,सचिव सोमनाथअप्पा निलंगे,सहसचिव प्रकाश खोत,शिरीष सलगरे,रवीअप्पा मिसाळ,अशोक नावंदे,दत्ता गोपनपाळे,कोषाध्यक्ष सोमनाथ गोपनपाळे,पारायण प्रमुख दयानंद चौधरी,समन्वयक संजय खाकरे,प्रा.प्रवीण फुटके,सचिन काटकर,गणपत हरंगुळे,कैलास रिकीबे,सदानंद चौधरी,जगदीश मिटकर,गिरीष बेंबळगे,संतोष जुजगर,अतुल बेंडे प्रमुख पदाधिकारी वैजनाथ(बबन) शेटे,बबनअप्पा नाईक,गिरीष संकाये,रमेश चौधरी सर,गणेश स्वामी,संदीप चौधरी,उमाकांत पोपडे,दीपक कापसे,कपील चौधरी,अनिल मिसाळ,अनिल चौधरी,दयानंद स्वामी,योगेश स्वामी तसेच वीरशैव समाज व श्रावणमास तपोनुष्ठान समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# स्व.डॉ.विमलताई मुंदडा यांच्या जयंती निमित्त महाराष्ट्राचे पोवाडे व लोकगीतांचा कार्यक्रमाचे आयोजन

**अंबाजोगाई।प्रतिनिधी**
येथिल वसुंधरा सेवा प्रतिष्ठाण यांच्या वतीने गेल्या२१ वर्षांपासून सुरू असलेल्या ताई महोत्सवाच्या निमित्ताने माजी मंत्री स्व. डॉ. विमलताई मुंदडा यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्राची लोकगाणी पोवाडे व लोकगीताच्या कार्यक्रमाचे आयोजन दि.१४ ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे. अशी माहिती वसुंधरा सेवा प्रतिष्ठान वतीने देण्यात आली आहे. केज विधानसभा



मतदारसंघाच्या भाग्यविधात्या स्व. डॉ.विमलताई मुंदडा यांच्या जयंती निमित्त झी मराठी, सोनी मराठी, कलर्स मराठी झी युवा संगीत सम्राट फेम युवा शाहीर रामानंद उगले यांचा महाराष्ट्राची लोकगाणी पोवाडे व लोकगीतांचा कार्यक्रम दि.१४ ऑगस्ट २०२४ बुधवार रोजी सायंकाळी ६ वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात महिलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. ताई महोत्सवात दि.१४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून रक्तदात्यांनी महादू मस्के यांच्याकडे आई निवास,बीड रोड येथे प्राथमिक नाव नोंदणी करावी असे वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने कळविण्यात आले आहे. सदरील कार्यक्रमास मतदारसंघातील तसेच अंबाजोगाई तालुका व शहरातील नागरिक, महिला, युवकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## छत्रपती संभाजीनगरचे पोलीस अधी- क्षक मनिष कलवानिया यांची बदली.



छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक मनिष कलवानिया यांचा कार्यकाळ संपल्याने बदली झाली, त्यानिमित्त त्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या मुख्य हॉल मध्ये आयोजित करण्यात आला होता. मनिष कलवानिया यांचे पोलीस प्रशासनातील कामकाज प्रशंसनीय होते त्याच बरोबर विविध स्तरातील नागरिकात जाऊन, मार्गदर्शन शिबिर, कार्यशाळा घेऊन तरुणांना नोकरीच्या प्रवाहात आणण्यासाठी सतत प्रयत्न. शाळा, विद्यालयातील विद्यार्थ्यांना भेटी देत, त्यातील हुशार, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना मदत केल्याचेही त्यांचे अनेक उदाहरणे आहे.अशा सामाजिक बांधिलकी असलेल्या अधिकाऱ्यास निरोप देताना अनेक विभागातील अधिकारी, नागरिक हजर होते. यावेळी डॉ.मोनिका कलवानिया,सहाय्यक पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार, सिल्लोड पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. दिनेश कोल्हे, सिल्लोड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक विजयसिंह राजपुत, उपनिरीक्षक कोमल शिंदे, शिवाजीराव नागवे, शेषराव उधार,बाबासाहेब भापकर, रवी देशमुख,राहुल सुरडकर, ज्ञानेश्वर गायकवाड, जावेद पठाण, ज्ञानविकास विद्यालय भराडीचे मुख्यध्यापक रायभान जाधव उपस्थित होते..

## अज्ञात वाहनाच्या धडकेत पतीचा मृत्यू तर पत्नी गंभीर जखमी

**अंबाजोगाई।प्रतिनिधी**
शहरापासून जवळ असलेल्या अंबाजोगाई - परळी रस्त्यावरील शेपवाडी गावाजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अपघातात पतीचा मृत्यू तर पत्नी गंभीर जखमी असल्याने लातूर येथील खाजगी रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहे. अपघाताची ही घटना दि.१० ऑगस्ट शनिवारी सायंकाळी घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, अंबाजोगाई शहरातील क्रांतीनगर परिसरात राहणारे दाम्पत्य अहमद शफी सय्यद व पत्नी रईसा अहमद हे तालुक्यातील धायगुडा पिंपळा या ठिकाणी मुलीला भेटण्यासाठी दुचाकीवर गेले होते. मुलीची भेट घेऊन ते अंबाजोगाईकडे दुचाकीवर येत होते. शेपवाडी जवळ ते आले असता अज्ञात वाहनानी त्यांच्या दुचाकीला



जोराची धडक दिली. या अपघातात दोघेही पती-पत्नी गंभीर जखमी झाले. त्यांना अधिक उपचारासाठी तातडीने लातूर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतू, उपचारादरम्यान अहमद शफी सय्यद यांचा रविवारी मृत्यू झाला तर पत्नी रईसा अहमद या खासगी रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहेत. दरम्यान रविवारी अहमद शफी सय्यद यांचा दफनविधी करण्यात आला. या घटनेमुळे क्रांतीनगर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस करित आहेत.

# केजला अतिक्रमनाचा विळखा वाढत्या अतिक्रमणावर कोण मेहरबान ?



**केज प्रतिनिधी**
केज शहरात मुख्य रस्त्याच्या लगत उजव्या बाजूला कृषी विभागाच्या फलोत्पादनाच्या जागेत अतिक्रमण मोठ्या प्रमाणात सुरू आहे. अतिक्रमण धारक बिनधास्तपणे हवी तेवढी जागा पकडून त्यावर कब्जा करत आहेत. तिथे पत्र्याचे शेड उभा करून ते व्यवसायिकांना भाड्याने दिले जात आहे. अतिक्रमण करणारे हे धनदांडगे लोक कोण? त्यांना कोणाचा वरधास्त आहे. अद्याप पर्यंत पोलिसांकडे कृषी विभागाकडून क साधी तक्रार ही केली गेली नाही, तक्रार आली नाही म्हणून पोलिसांनी काही कारवाई केली नाही मात्र त्यामुळे अतिक्रमणाचा विळखा वाढत आहे. अतिक्रमणधारकावर कारवाई का होत नाही त्यांच्यावर प्रशासन का मेहरबान आहे असा प्रश्न सामान्य नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

### पंकज कुमावत यांनी फिरवला होता अतिक्रमणावर हातोडा

तत्कालीन सहाय्यक पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी दबंग कारवाई करत अतिक्रमणावर हातोडा फिरवला होता त्यांची बदली झाली आणि काही दिवसातच केजचे अतिक्रमण जैसे थे नव्हे तर त्याहून अधिक वाढले आहे.

### कृषी अधिकारी,तहसीलदार, पोलीस निरीक्षक गप्प का ?

दिवसाढवळ्या अतिक्रमणाचा विळखा वाढत असताना केज तालुका कृषी अधिकारी, नगरपंचायत चे मुख्य कार्यकारी अधिकारी ,केजचे तहसीलदार ,पोलीस निरीक्षक, उपविभागीय अधिकारी अतिक्रमण होत असताना हे सर्व बघूनही गप्प का आहेत ? कारवाई का केली जात नाही हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### व्यवसायिकांना जागा हवीच ;

छोटे व्यवसायिकांना व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध होणे आवश्यकच आहे मात्र अतिक्रमण करणारे धन दांडगे ती जागा पकडून त्याचे आव्वाच्या सवा भाडे दर लावून छोट्या व्यवसायिकांची लूट करून, पैसे उकळून मलामाल होत आहेत शेहरात होत असलेले वाढते अतिक्रमण काढून फलोत्पादनाच्या जागेत व्यावसायिक टपरीधारकांना हक्काचे गाळे उपलब्ध करून द्यायला हवेत याकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे

# बीडमध्ये राज्यातील ४ थे डिजिटल ग्रंथालय इमारतीच्या जागेचे पालकमंत्री यांच्या हस्ते हस्ते होणार भूमिपूजन

### ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांना मोफत डिजिटल सुविधा व इतर सुविधा

विद्यार्थ्यांसाठी २५ संगणक , मोफत वायफाय , गॅजेट्स , २८ प्रकारची वर्तमानपत्रे , १५० हून जास्त मासिक नियतकालिके , ४५ हजारांहून जास्तीचे पुस्तके, ग्रंथ तसेच कादंबऱ्या उपलब्ध आहेत. त्याचबरोबर ग्रंथालयाचे सभासदांसाठी सुद्धा वर्तमानपत्रे ,मासिक नियतकालिके, ग्रंथ, कादंबऱ्या ,रिसर्च पेपर ,कोर्ट निकाल ,रिसर्च जागतिक माहिती अशा प्रकारे अजून बरेच काही सुविधा उपलब्ध केलेले आहेत. या सर्व गोष्टींचा फायदा घेण्यासाठी नागरिकांना ग्रंथालयाचे सभासद व्हावे लागेल. हे सभासद पद दोन वर्षासाठी फक्त ६०० रुपयांत होते. तसेच मुले व मुलींच्या सोयीसाठी वेगवेगळे विभाग उपलब्ध आहे, जसे --वर्तमानपत्र विभाग , डिजिटल विभाग , जेष्ठ नागरिक विभाग ,जनरल वाचन कक्ष विभाग , गटचर्चा विभाग , एमपीएससी विभाग , यूपीएससी विभाग या सर्व विभागांचे मुले व मुलींची वेगवेगळे स्वातंत्र्य विभाग आहे. वरील सर्व बाबी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत सुविधा देऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना नोकरी लागावी व दलित समाजाचा विकास व्हावा हाच ग्रंथालयाचा प्रमुख उद्देश आहे.

### जिथे गेलो तिथे नवीन स्वातंत्र्य ग्रंथालय इमारती उभारल्या -- जिल्हा ग्रंथालय अधिकारी,संजय मस्के

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बीड येथील सध्याचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी या पदावर संजय मस्के हे कार्यरत आहे. संजय मस्के हे धुळे , जालना , घनसांगवी , नंदुरबार , हिंगोली , लातूर येथे जिल्हा ग्रंथालय अधिकारी या पदावर कार्यरत असताना तिथे ग्रंथालयाच्या स्वातंत्र्य जागा व इमारती बांधण्यासाठी संबंधित जिल्हा प्रशासनाकडुन निधी मिळवून देण्यात सर्वात जास्त मोलाचा वाटा संजय मस्के यांचा आहे.

बीड , दि. 11 : बीडमध्ये महाराष्ट्र शासन उच्च तंत्र व शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखाली, ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई अंतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय , बीड यांच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता सर्व्हे. नं. ३४ , सहयोगनगर , शासकीय गोदाम , जालना रोड , बीड येथे राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते होणार असून हे ग्रंथालय राज्यातील ४ थे डिजिटल ग्रंथालय म्हणून साकारणार आहे. याबाबत अधिक माहिती अशी की , बीडमध्ये जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय , बीड याची स्थापना 2005 साली नगर रोड, बीड येथे एका भाडाच्या जागेत झाली. वर्षानुवर्षे या ग्रंथालयामध्ये हजारो संख्येने शालेय विद्यार्थी , एमपीएससी यूपीएससी स्पर्धा परीक्षाचे तयारी करणारे विद्यार्थी तसेच वकील ,शासकीय अधिकारी, कर्मचारी व ज्येष्ठ नागरिक सभासद असून ग्रंथालयातील सुविधेंचा उपयोग करीत आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासाकरिता सकाळी ८ ते संध्याकाळी ८ वाजेपर्यंत हे ग्रंथालय सुरू राहते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना उत्तम दर्जेचे वाचनीय साहित्य व सुविधा उपलब्ध करून देते. एमपीएससी , यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षा तयारी करणारे विद्यार्थी त्याचबरोबर व्यवसायिक अभ्यासक्रमांचे विद्यार्थी यांना अति उत्तम दर्जाचे डिजिटल सुविधा प्राप्त व्हावे यासाठी या जिल्हा ग्रंथपाल अधिकारी,संजय मस्के यांनी जिल्हा प्रशासनाकडे कार्यालयाच्या नवीन स्वातंत्र्य इमारतीसाठी प्रस्ताव दिला होते. संजय मस्के यांनी राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे व मा.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती ,मा अविनाश पाठक साहेब ,यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन स्वातंत्र्य इमारतीसाठी ५ कोटींचा निधी मंजूर करून घेतला. जिल्हा प्रशासनाने या ग्रंथालयाच्या स्वातंत्र्य इमारतीसाठी २० हजार चौ. फूट जागेची संमती दिली असून एवढ्या प्रचंड जागेत १६ हजार चौ. फूट अशी भव्य दोन मजली इमारतीचे बांधकाम होणार आहे . भूमिपूजन कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून यांची उपस्थिती--
राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे उद्घाटक म्हणून लाभले आहे. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून खा.रजनी पाटील ,आ.पंकजा मुंडे ,खा.बजरंग सोनवणे ,आ. संदीप क्षीरसागर ,आ.प्रकाश सोळंके ,आ.लक्ष्मण पवार , आ.सतीश चव्हाण ,आ.विक्रम काळे , आ.बाळासाहेब आजबे ,आ.नमिता मुंदडा ,मा. अविनाश पाठक,भा.प्र.से. ,अविनाश बारगळ , भा.पो.से.संगीतादेवी पाटील भा.प्र.से.,मा. अशोक गाडेकर , मा.गजानन कोटेवार , डॉ रामेश्वर पवार ,मा.सुनील हुसे , मा.राम मेकले ,मा सुधीर चाटे व ईतर या सर्वांची उपस्थिती लाभनार आहे . ना.धनजय मुंडे यांच्या प्रयत्नातून साकारनार डिजिटल ग्रंथालय भव्य ईमारत प्रशासकीय सेवेत बीड जिल्ह्यातील टक्केवारी वाढावी म्हणून शासकीय ग्रंथालय ची उभारणी.ना धनंजय मुंडे डिजिटल ग्रंथालय काळाची गरज.ना.धनजय मुंडे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

सोमवार १२ ऑगस्ट २०२४

पान क्रं - ४ PAGE NO 4



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे


# महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींसाठी खूशखबर, पुढचे ६ महिने तरी टेन्शन नाही, प्रत्येक महिन्याला १५०० मिळणारच

राज्यभरात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची चांगलीच चर्चा सुरु आहे. राज्यभरातील लाखो महिलांनी या योजनेसाठी अर्ज केला आहे. अनेक महिलांचे अर्ज स्वीकारले देखील गेले आहेत. असं असताना आता एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. राज्यातील महिलांना लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून येत्या 17 ऑगस्टला 3 हजार रुपये मिळणार आहेत. यानंतर राज्य सरकारकडून दर महिन्याला महिलांच्या बँक खात्यात प्रत्येकी 1500 रुपये जमा होणार आहेत. हे पैसे किती दिवस मिळणार? याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. पण राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यामुळे महिलांना पुढचे 6 महिने तरी टेन्शन नाही. कारण त्यांना लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून दर महिन्याला 1500 रुपयांची आर्थिक मदत ही कमीत कमी सहा महिने तर शंभर टक्के मिळणार आहे. "लाडली बहीण योजनेसाठी 46 हजार कोटी वर्षाला लागणार आहेत. अर्थ विभागाने तो निधी आम्हाला वितरीत केला आहे. 17 तारखेचा पहिल्या हप्त्याचा निधीसह पुढचे सहा महिन्यांचा निधीची तरतूद केली आहे. त्यानंतर होणाऱ्या अर्थसंकल्पात सादर होईल ते उपलब्ध होईल", अशी माहिती महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली.



## घाणेगाव तांडा येथे अवैध धंदे जोमात सुरू..

तालुक्यातील घाणेगाव तांडा येथे हातभट्टी गावठी देशी दारू जोमात सुरु सावळदबारा चौकी अंतर्गत पोलिसांना लक्ष देण्याची गरज आहे हातभट्टी गावढी सरसपणे खुलेआम दारू विक्री.

या गावात अवैध धंदे करणारेना पोलिसांचा धाक राहिला नाही गावात रोडावरती खुलेआम होते गावठी दारू विक्री अवधधंदे करणारे वर कारवाई का होत नाही गावातील नागरिकांना पडले प्रश्न.

गावात हातभट्टी गावठी दारू पिल्यामुळे दारू पिणारे मृत्यू संख्या दिवसेंदिवस वाढत आहे गावात हातभट्टी गावठी दारू मिळत असल्यामुळे नवीन पिढीचे मुलं दारूचे व्यसनाला आधिन होत आहे त्यांचे आयुष्य धोक्यात आले आहे अगदीच लहान मुलांना सुद्धा व्यसने लागत असून पुढील भहुतव्य अंधारात दिसत आहे अनेक कुटुंब उघड्यावर पडले असून त्यामुळे महिला वरील अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे.

यामुळे महिलावर्ग त्रस्त असून वरिष्ठांनी या बाबीकडे दुर्लक्ष न करता फर्दापूर पोलीस स्टेशन वरिष्ठांनी व छत्रपती संभाजीनगर पोलीस अधीक्षक ग्रामीण ऐ सि पी साहेबांनी या घाणेगाव तांडा या गावात चालणारे अवैध धंदे बंद करण्यात यावे अशी मागणी गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिला वर्ग करीत आहे

## नैनिताल येथे अभि पवार नॉलेज व्हेव इंडिया मास्टर परफॉर्मर अवार्ड- २०२४राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**पाटोदा प्रतिनिधी**

आजचे युग हे डिजिटल युग आहे. इंटरनेट व डिजिटल मोबाईल मुळे जग खुप जवळ आले आहे.आजची तरुणाई मोबाईल सोशल मीडिया च्या विविध साइट च्या अति वापराने वेळ व पैसा सतत खर्च करताना आपणास जाणवते परंतु मोबाइल चा वापर अर्थार्जना साठी होऊ शकतो यासाठी विविध पर्याय उपलब्ध आहेत परन्तु ते शोधता आले पाहिजे व त्याचा वापर करता आला पाहिजे.केंद्र शासनाच्या डिजिटल इंडिया अंतर्गत देश अधिक प्रभावित झाल्याचे अलिकडच्या काळात जाणवते आहे. सोशल मीडिया च्या विविध साइट वर पैसे कमविन्याचे मार्ग असताना भारत सरकार मान्यताप्राप्त नॉलेज वेव इंडिया च्या वतीने वयाच्या 20 व्या वर्षी डिजिटल मार्केटिंग पदवी चे शिक्षण घेणारा व महिन्याला लाखों रुपये कमऊन अर्न एंड लर्न या कमवा व शिका उक्तिला सार्थ



ठरवनारा आष्टी तालुक्यातील खडकत येथील शिवाजी पवार यांचे सुपुत्र अभी शिवाजी पवार याला उत्तराखंड च्या नैनीताल येथील हॉटेल होको च्या भव्य सभागृहात राष्ट्रीय स्तरावरील "नॉलेज वेव इंडिया मास्टर परफॉर्मर अवॉर्ड- 2024"या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सोशल मीडिया चा वापर करून डिजिटल बिझिनेस मधुन वयाच्या २० वर्षी अभी शिवाजी पवार हा युवक कमवतोय महिन्याला लाखो रुपये व दोन महिन्यांमध्ये 5 लाख पेक्षा जास्त पैसे कमवुन व कोच प्रशिक्षक म्हणून 800+ पेक्षा जास्त लोकांना शिकवलं की मोबाईल चा वापर करून तुम्ही कशे पैसे कमवु शकता? कमी दिवसात जास्त प्रमाणात अचीवमेंट केल्याने सदर राष्ट्रीय पुरस्कार अभी पवार यास नॉलेज वेव इंडिया चे संस्थापक हर्ष विकल यांचे हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार

## ज्ञानराधा मल्टीस्टेट ठेविदारांचा प्रश्न मार्गी लावण्याची राज ठाकरे यांच्याकडे वर्षाताई जगदाळे यांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेत हजारो ठेवीदारांचे कोट्यावधी रुपये अडकले आहेत. मनसेने वेळोवेळी या विरोधात आंदोलन केलेली आहे. बीड येथे संघर्ष यात्रा निमित्त मनसे प्रमुख राज ठाकरे आले असता त्यांच्यासोबत ज्ञानराधा मल्टीस्टेट संदर्भात चर्चा करत ठेविदारांची अडकलेली ठेवी परत मिळून देण्यासाठी मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांच्याशी चर्चा करत प्रश्न मार्गी लावण्या संदर्भात मनसेच्या महिला आघाडीच्या प्रदेश



उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याशी चर्चा केली. ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळा जिल्ह्याला आर्थिक संकटात टाकणारा ठरला. मागील आठ महिन्यापासून हक्काच्या ठेवीसाठी ठेवीदार दारोदार फिरत आहेत. ज्ञानराधाचे प्रमुख सध्या जेलची हवा खात आहे .त्यांच्यावर जिल्हाभरात अनेक गुन्हा दाखल झालेले आहेत परंतु ठेवीदारांना त्यांच्या हक्काच्या ठेवी कधी परत मिळणार याची निश्चिती सांगता येत नाही. इडी कडून ज्ञानराधाच्या सर्व संपत्तीवर टाच आणला जात आहे. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी थेट संवाद साधत बीड मधील ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रकरणात लक्ष घालून मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी चर्चा करावी यासाठी मनसेच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी राज ठाकरे यांच्याशी ज्ञानराधा मल्टीस्टेट प्रश्नावर व्यापक चर्चा करत सत्य परिस्थिती समोर मांडली. ज्ञानराधा मल्टीस्टेट विरोधात जागरण गोंधळ, आंदोलन तथा मोर्चे उपोषण मनसेच्या वतीने करण्यात आलेली आहे सामान्य ठेविदारासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना सदैव रस्त्यावर उतरत असल्याने ठेवीदारांना राज ठाकरे व मनसे कडून अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.



राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गट यांचे युवा कार्यकर्ते मनोज फरके यांचा वाढदिवस साजरा करताना राम यादव उद्योजक व संजय जाधव अशोकराव उगले व परमेश्वर सोळंके

# शिवनामाचा जप आणि कीर्तन आत्मिक शांति आणि सकारात्मक ऊर्जा देतात

## शि.भ.प.शिवकांता आनंदराव यांचे शिवनाम कीर्तन उत्साहात संपन्न

## श्रावणमास तपोनुष्ठान समिती व वीरशैव लिंगायत समाजाचा संयुक्त उपक्रम

**परळी वैजनाथ।प्रतिनिधी**

श्रावणमास तपोनुष्ठान समिती व वीरशैव लिंगायत समाज परळीच्या संयुक्त उपक्रमाने आयोजित अखंड शिवनाम कीर्तन कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा होत आहे. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून प्रसिद्ध वक्त्या शि.भ.प.शिवकांता आनंदराव यांनी आपल्या भक्तिपूर्ण भाषणातून उपस्थितांना शिवनामाच्या महत्त्वाची आणि लाभांची कल्पना दिली. पुढे बोलताना शि.भ.प.शिवकांता आनंदराव यांनी म्हटले की, "शिवनामाचा जप आणि कीर्तन हे आपल्याला आत्मिक शांति आणि सकारात्मक ऊर्जा देतात,आजच्या युगात धार्मिकता आणि एकात्मतेची गरज अधिक आहे आणि त्यामुळे या प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन अत्यंत आवश्यक आहे."या कीर्तनाने उपस्थितांच्या मनातील श्रद्धा आणि भक्तीला उत्तेजन दिले. दिनांक 5 ऑगस्टपासून परळी वैजनाथ येथील पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेले श्री शनि मंदिर येथे वसुंधरारत्न डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर यांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने वीरशैव लिंगायत समाज व श्रावणमास तपोनुष्ठान समिती परळीच्या वतीने ष.ब्र.108 श्री गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या श्रावणमास तपोनुष्ठान मोठ्या उत्साहात सुरु असून दररोज सकाळी शिवपाठ,परमरहस्य ग्रंथाचे पारायण, गाथ्यावरील भजन,शिव कीर्तन,शिजागर व नामांकित कीर्तनकारांच्या कीर्तनाचे तसेच प्रसादाचे आयोजन दररोज करण्यात येत आहे.रविवारी



महाप्रसाद व गुरूवर्यांचे पुजन श्री.सांभाअप्पा लांडगे व श्री.वैजनाथअप्पा कोल्हे परीवार यांच्यावतीने करण्यात आले तसेच यावेळी दै.लोकमतचे तालुका प्रतिनिधी संजय खाकरे,दै. सकाळचे पत्रकार प्रा.प्रवीण फुटके सर, दै.रणझुंझार चे पत्रकार श्री.संतोष जुजगर व श्री. बालाजी ढगे यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वीरशैव लिंगायत समाज व श्रावणमास तपोनुष्ठान समितीचे अध्यक्ष चेतन सौंदळे,कार्यअध्यक्ष चंद्रकांत उदगीरकर,शाहूराव ढोबळे,उपाध्यक्ष रमेशअप्पा सपाटे,मकरंद नरवणे,प्रा.महेश्वर निर्मळे,रघुनाथअप्पा भाग्यवंत,चंदूअप्पा हालगे,संतोष पंचाक्षरी,मनोज संकाये,सचिव सोमनाथअप्पा निलंगे,सहसचिव प्रकाश खोत,शिरीष सलगरे,रवीअप्पा मिसाळ,अशोक नावंदे,दत्ता गोपनपाळे,कोषाध्यक्ष सोमनाथ गोपनपाळे,पारायण प्रमुख दयानंद चौधरी,समन्वयक संजय खाकरे,प्रा. प्रवीण फुटके,सचिन काटकर,गणपत हरंगुळे,कैलास रिकीबे,सदानंद चौधरी,जगदीश मिटकर,गिरीष बेंबळगे,संतोष जुजगर,अतुल बेंडे प्रमुख पदाधिकारी वैजनाथ(बबन) शेटे,बबनअप्पा नाईक,गिरीष संकाये,रमेश चौधरी सर,गणेश स्वामी,संदीप चौधरी,उमाकांत पोपडे,दीपक कापसे,कपील चौधरी,अनिल मिसाळ,अनिल चौधरी,दयानंद स्वामी,आदेश हलकंचे,योगेश स्वामी सर्व पदाधिकारी सदस्य प्रयत्न करीत आहे. कार्यक्रमास भावीक भक्तांची मोठी उपस्थिती दररोज लाभत आहे. यामुळे पंचम ज्योतिर्लिंग वैजनाथ मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com